## पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटार वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / फ्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक २६ वा | मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ‘तुझ्या आमदार दादाला गोळ्या घाल, पुढचं आम्ही बघून घेऊ’

## आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हत्येची सुपारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातून एक धक्कादायक आणि गंभीर घटना समोर आली आहे. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना गोळ्या घालून ठार मारण्यासाठी त्यांच्या वाहनचालकाला पैशांचे आमिष दाखवल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणामुळे सोलापूरच्या राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली असून आमदारांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

सोलापुरातील महावीर चौक परिसरात हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. आमदारांच्या वाहनचालकाला दोन व्यक्तींनी गाठून, "तुझ्या आमदार दादाला गोळ्या घाल, तुला पैसे देतो; पुढचं आम्ही बघून घेऊ," अशा स्वरूपाची ऑफर दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी वाहनचालक आनंद सुरवसे यांच्या तक्रारीवरून सोलापुरातील सदर बाजार पोलीस ठाण्यात दोन संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**आमदारांच्या चालकाला थेट हत्येची ऑफर?**

मिळालेल्या माहितीनुसार, भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे कुटुंबीय सोलापुरात खरेदीसाठी आले होते. त्यावेळी आमदारांचे वाहनचालक आनंद सुरवसे हे गाडीजवळ थांबले होते. याचवेळी श्रीशैल हुळ्ळी आणि फुलारी नावाचे दोन व्यक्ती त्यांच्याजवळ आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या दोघांनी चालकाला पैशांचे आमिष दाखवत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यावर गोळ्या झाडण्यास सांगितल्याचा आरोप आहे.





**ऑफर नाकारली; आरोपींचा घटनास्थळावरून पळ**

आमदारांच्या हत्येसाठी दिलेली ही कथित ऑफर ऐकून चालक आनंद सुरवसे यांनी त्यास नकार दिला. उलट त्यांनी या दोघांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रकरण उघड होण्याची शक्यता लक्षात येताच दोन्ही संशयितांनी घटनास्थळावरून पळ काढल्याचे सांगण्यात आले आहे. घडलेल्या प्रकाराचे गांभीर्य लक्षात घेत चालकाने वेळ न दवडता सदर बाजार पोलीस ठाणे गाठले आणि पोलिसांना संपूर्ण घटनेची माहिती दिली.

**दोन संशयितांविरोधात गुन्हा दाखल**

चालक आनंद सुरवसे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी श्रीशैल हुळ्ळी आणि त्याचा साथीदार फुलारी यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील आरोपांची पोलिसांकडून चौकशी सुरू असून, आमदारांच्या हत्येसाठी अशी ऑफर नेमकी कोणाच्या सांगण्यावरून देण्यात आली होती, त्यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का आणि या कथित कटामागचा उद्देश काय होता, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

**आमदारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

भाजपचे अक्कलकोटचे विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याबाबत त्यांच्या चालकाला कथितरीत्या हत्येची ऑफर दिल्याचे प्रकरण समोर आल्याने आमदारांच्या सुरक्षेचा मुद्दा गंभीर बनला आहे. विशेष म्हणजे, हा प्रकार केवळ धमकीपुरता मर्यादित होता की त्यामागे प्रत्यक्ष हत्येचा कट रचला जात होता, हे तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे. पोलिसांकडून या दिशेने तपास केला जाण्याची शक्यता आहे. आता पोलिसांच्या तपासात या कथित हत्येच्या कटामागे नेमके कोण आहे, संशयितांचा उद्देश काय होता आणि त्यांनी चालकाला कोणत्या आधारावर पैशांचे आमिष दाखवले, याची उकल होणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**तपासातून अनेक प्रश्नांची उत्तरे मिळणार**

या प्रकरणात दोन संशयितांविरोधात गुन्हा दाखल झाला असला, तरी गुन्हा दाखल होणे म्हणजे आरोप सिद्ध होणे नव्हे. पोलिस तपासानंतरच या घटनेमागील नेमके सत्य समोर येईल. या कथित कटामध्ये आणखी व्यक्तींचा सहभाग आहे का, याचाही तपास होणे अपेक्षित आहे.

## सोलापूरच्या कन्या सौ. सोनाली राहुल डोईजड - नायकू यांचा ‘युवा समाजभूषण पुरस्कार २०२६’ने गौरव

**पिंपरी (कटूसत्य वृत्त):-** घर, पती, दोन मुलांची जबाबदारी, नोकरी आणि स्वतःची स्वप्ने यांचा समतोल साधत अथक मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या सोलापूरच्या कन्या सौ. सोनाली राहुल डोईजड नायकू यांना लिंगायत गवळी विकास फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने ‘युवा समाजभूषण पुरस्कार - २०२६’ आचार्य अत्रे रंगमंदिर, पिंपरी येथे प्रदान करून गौरविण्यात आले.



सोलापूरच्या कन्या सौ. सोनाली डोईजड नायकू यांना ‘युवा समाजभूषण पुरस्कार २०२६’ प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

सोनाली यांनी इउअ आणि MBA (HR & Systems) शिक्षण पूर्ण केले. करिअरच्या वाटचालीत मंदीचा काळ, नोकरीतील खंड, स्पर्धा परीक्षांमधील अपयश आणि त्यानंतर आलेल्या मातृत्वाच्या जबाबदाऱ्या अशा अनेक आव्हानांना त्यांना सामोरे जावे लागले. मात्र परिस्थितीसमोर हार न मानता २०१७ मध्ये त्यांनी पुन्हा नव्याने सुरुवात केली.

नोकरीसोबत दोन मुलांचे संगोपन, घराची जबाबदारी आणि करिअर यांचा समतोल साधताना त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. अनेकदा स्वतःचा थकवा बाजूला ठेवून कुटुंब आणि करिअर या दोन्ही आघाड्यांवर त्या ठामपणे उभ्या राहिल्या. स्वतःची स्वप्ने पूर्ण करण्याची जिद्द त्यांनी कधीही सोडली नाही.

या प्रवासात त्यांचे पती आणि दोन मुलांची साथ, तसेच सासूबाईंचा खंबीर आधार त्यांच्यासाठी अत्यंत मोलाचा ठरला. त्याचबरोबर त्यांचे काका अनिलजी नायकू, चेअरमन - सोलापूर गवळी समाज सहकारी पतसंस्था यांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि आधारही त्यांच्या वाटचालीत महत्त्वाचा ठरला.

आज त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे फलित म्हणून त्या Fujitsu या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये Project Management Officer (PMO) म्हणून यशस्वीपणे कार्यरत आहेत.

सोनाली यांचा प्रवास म्हणजे केवळ एका महिलेच्या यशाची कहाणी नाही; तो आहे नारीशक्तीचा, मातृत्वासोबत करिअर घडविणाऱ्या आईचा, कुटुंबाच्या जबाबदाऱ्या सांभाळत स्वतःची स्वप्ने पूर्ण करणाऱ्या पत्नीचा आणि परिस्थितीसमोर न झुकणाऱ्या कर्तृत्ववान स्त्रीचा प्रेरणादायी प्रवास.

‘यश हे नशिबाचे नसते, ते असते जिद्द, परिश्रम आणि संस्कारांचे फळ!’ या विचाराला त्यांनी आपल्या जीवनातून सार्थ ठरवले आहे.

यावेळी माजी नगरसेवक नारायणराव बहिरवाडे, प्रकाश चौधरी, वामन आप्पा काटकर, प्रा. संभाजी बारसे तसेच लिंगायत गवळी विकास फाउंडेशन, पुणेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

सोलापूरच्या मातीतून सुरू झालेला हा प्रवास आज जागतिक कॉर्पोरेट विश्वापर्यंत पोहोचला आहे. ही केवळ यशाची कहाणी नाही; ही आहे संघर्षाची, कुटुंबाच्या साथीची आणि आपल्या स्वप्नांसाठी अखंड झटणाऱ्या एका नारीशक्तीची प्रेरणादायी गाथा!

## होटगी रोडच्या कॉंक्रीटीकरणाला महापालिकेचा 'ब्रेक महापालिका प्रशासनाची नोटीस

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महिला हॉस्पिटल ते विमानतळ ते साखर कारखाना या मार्गावरील रस्त्याचे काम प्रगतीपथावर असतानाच महापालिकेच्या पाणीपुरवठा पाइपलाइन, ड्रेनेजलाइन, पावसाळी पाण्याचा निचरा आणि सीडी वर्क्सशी संबंधित कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले.



त्यामुळे ही कामे पूर्ण होईपर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण थांबविण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. अतिरिक्त आयुक्त-२ यांच्या स्वाक्षरीने सोमवारी, १० ऑगस्ट रोजी संबंधित यंत्रणेला याबाबत आदेश देण्यात आले.

होटगी रोड एसएच-३९६ वरील महिला हॉस्पिटल ते विमानतळ आणि पुढे साखर कारखान्यापर्यंतच्या रस्त्याच्या विकासाचे काम टरकऊच्या माध्यमातून सुरू आहे. मात्र, रस्त्याचे कॉंक्रीटीकरण पूर्ण झाल्यानंतर भविष्यात पाणीपुरवठा किंवा ड्रेनेजलाइनच्या दुरुस्तीसाठी पुन्हा कॉंक्रीट फोडण्याची वेळ येऊ नये, यासाठी महापालिकेने आधी अंतर्गत युटिलिटीची सर्व कामे पूर्ण करण्याचा आग्रह धरला आहे.

महापालिका प्रशासनाने यापूर्वीच संबंधित यंत्रणेला लेखी पत्रव्यवहार करून तसेच नकाशांच्या माध्यमातून आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, त्यानंतरही काही महत्त्वाची कामे प्रलंबित राहिल्याचे महापालिकेचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित भागातील नगरसेवक, महापालिका अधिकारी आणि संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली होती.

दरम्यान, ४ ऑगस्ट रोजी महापौरांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेत महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीला नगरसेवक-नगरसेविका, महापालिका आयुक्त तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. होटगी रोडच्या कामातील त्रुटी, पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि पावसाळी पाण्याच्या निचऱ्याशी संबंधित प्रलंबित कामांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. रस्ता पूर्ण होण्यापूर्वी महापालिकेच्या अखत्यारितील सर्व आवश्यक कामे पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**आधी युटिलिटी, मग कॉंक्रीट**

महापालिकेने आता स्पष्ट भूमिका घेत 'आधी अंतर्गत युटिलिटीची कामे पूर्ण करा आणि त्यानंतर रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करा', असा पवित्रा घेतला आहे. संबंधित यंत्रणा, महापालिकेचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत पुन्हा संयुक्त पाहणी व सर्वेक्षण करून प्रलंबित कामे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महापालिकेच्या आदेशामुळे सध्या सुरू असलेल्या रस्ते कामाला तात्पुरता ब्रेक लागला आहे. रस्ता विकासासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होत असताना भविष्यात त्याच रस्त्याची पुन्हा खोदाई होऊ नये, हा महापालिकेचा मुख्य मुद्दा आहे. मात्र, दुसरीकडे सुरू असलेले काम अचानक थांबविल्याने प्रकल्पाच्या वेळापत्रकावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

होटगी रोड हा विमानतळाकडे जाणारा महत्त्वाचा मार्ग असल्याने या वादाचा थेट परिणाम वाहतूक आणि नागरिकांवर होऊ शकतो. आता दोन्ही यंत्रणांमध्ये समन्वय साधून प्रलंबित कामे किती जलदगतीने पूर्ण केली जातात आणि कॉंक्रीटीकरण पुन्हा कधी सुरू होते, याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

## सोलापूरच्या नाभिक दुकानदारांसाठी स्वतंत्र पतसंस्था उभारणार

### संत सेना नाभिक दुकानदार संघाच्या सर्वसाधारण सभेत निर्णय

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहरातील २,२०० हून अधिक नाभिक दुकानदारांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वतंत्र पतसंस्था स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय संत सेना नाभिक दुकानदार संघाच्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. तसेच नाभिक दुकानदारांसाठी पेन्शन योजना सुरू करण्याची मागणीही शासनाकडे करण्यात आली. संघटनेच्या माध्यमातून व्यावसायिकांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

संत सेना नाभिक दुकानदार संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा सात रस्ता येथील उपलब्ध मंगल कार्यालयात पार पडली. या सभेत संघटनेच्या पुढील तीन वर्षासाठी नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. संघाच्या अध्यक्षपदी भास्कर तमन्नूर, तर सचिवपदी सिद्राम खट्टर यांची सवार्नुमते निवड झाली.

या बैठकीस मार्गदर्शक म्हणून मनोहर क्षीरसागर, पांडुरंग पाटील, सत्यनारायण रासकोंडा तसेच प्रमुख पाहुणे संजय जोगीपीटकर उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना ट्रस्टी अध्यक्ष आनंद सिंगराल यांनी केली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत सचिव अभयकुमार कांती यांनी केले.



**नाभिक व्यावसायिकांसमोरील अडचणींवर चर्चा**

यावेळी बोलताना आनंद सिंगराल यांनी सांगितले की, सोलापूर शहरात २,२०० हून अधिक नाभिक व्यावसायिक कार्यरत असून, त्यांच्या व्यवसायासमोर विविध अडचणी आहेत. दुकानांचे भाडे, वाढते वीजदर, व्यवसायातील चढ-उतार तसेच वयोमानानंतरच्या आर्थिक सुरक्षेचा प्रश्न यामुळे नाभिक व्यावसायिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

नाभिक दुकानदारांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी स्वतंत्र पतसंस्था उभारणे आवश्यक असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या पतसंस्थेच्या माध्यमातून व्यावसायिकांना आर्थिक मदत, कर्ज सुविधा आणि व्यवसायवाढीसाठी आवश्यक सहकार्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**वाढत्या वीजदराचा फटका**

नाभिक दुकानदारांना वाढत्या वीजदराचाही मोठा फटका बसत असल्याचा मुद्दा सभेत मांडण्यात आला. औद्योगिक दराने वीज आकारणी होत असल्याने व्यवसायाचा खर्च वाढत आहे. यासाठी शासनाकडे पाठपुरावा करून नाभिक दुकानदारांना सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

**पेन्शन योजनेची मागणी**

वर्षानुवर्षे नाभिक व्यवसाय करून उदरनिर्वाह करणाऱ्या व्यावसायिकांना वयोमानानंतर आर्थिक सुरक्षितता मिळावी, यासाठी शासनाने नाभिक दुकानदारांसाठी स्वतंत्र पेन्शन योजना सुरू करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. शासनाकडे या मागणीसाठी संघटनेच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**भास्कर तमन्नूर यांची अध्यक्षपदी निवड**

वार्षिक सर्वसाधारण सभेत पुढील तीन वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी भास्कर तमन्नूर, सचिव सिद्राम खट्टर, उपाध्यक्ष पांडुरंग पवार व जितेंद्र बेनाककर, कार्याध्यक्ष गोवर्धन कोडापके, खजिनदार शिवराज हडपद आणि प्रसिद्धीप्रमुख प्रकाश जोगीपीटकर यांची निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. संघटनेच्या माध्यमातून नाभिक दुकानदारांच्या समस्या शासनदरबारी मांडून त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे नूतन पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

‘नाभिक दुकानदारांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी पतसंस्था उभारणे, पेन्शन योजना लागू करणे आणि वीजदराचा प्रश्न मार्गी लावणे, या प्रमुख विषयांवर संघटनेचा प्राधान्याने पाठपुरावा राहील,’ असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## ४८ घरकुल लाभार्थ्यांचा हक्काचा निवारा मिळण्याचा मार्ग सुकर

### मंजूर जागेचा ताबा कायम ठेवण्यासाठी आ. राजू खरे यांचा पाठपुरावा

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मौजे चिंचोळीकाटी, ता. मोहोळ येथील गट क्रमांक १४४/१ मधील २२३०.०८ चौरस मीटर क्षेत्र प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुलांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. शासनाच्या मंजूर लेआऊट प्लॅन व मोजणी नकाशानुसार ग्रामपंचायतीमार्फत संबंधित ४८ घरकुल लाभार्थ्यांना जागेचा प्रत्यक्ष ताबा देण्यात आला असून, अनेक लाभार्थ्यांनी आपल्या घरकुलांच्या बांधकामास सुरुवात केली आहे.

मात्र, भविष्यात लाभार्थ्यांना कोणत्याही प्रकारची प्रशासकीय अथवा जागेसंदर्भातील अडचण निर्माण होऊ नये, तसेच मंजूर रेखांकनामध्ये कोणताही बदल होऊ नये आणि लाभार्थ्यांना देण्यात आलेला जमिनीचा ताबा कायम राहावा, यासाठी आ. राजू खरे यांनी मोहोळचे तहसीलदार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी तहसीलदारांची वेळोवेळी भेट घेऊन चर्चाही केली आहे.



४८ कुटुंबांना त्यांच्या हक्काचे पक्के घर मिळावे आणि त्यांना सुरक्षित निवारा उपलब्ध व्हावा, यासाठी आवश्यक तो प्रशासकीय पाठपुरावा सुरू ठेवण्याची भूमिका आ. राजू खरे यांनी घेतली आहे.

दरम्यान, घरकुल लाभार्थ्यांची मागणी पूर्ण होऊन त्यांच्या हक्काच्या घराचा मार्ग सुकर झाल्याबद्दल चिंचोळीकाटी येथील ४८ घरकुल लाभार्थी कुटुंबांनी आ. राजू खरे यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले. यावेळी लाभार्थ्यांनी त्यांचे स्वागतही केले. घरकुलाचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने पाऊल पडल्याने लाभार्थी कुटुंबांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

चिंचोळीकाटी येथील ४८ घरकुल लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे पक्के घर मिळावे, यासाठी पुढील काळातही आवश्यक प्रशासकीय पाठपुरावा सुरूच ठेवणार असल्याचे आ. राजू खरे यांनी सांगितले.



## संपादकीय

# व्यसनमुक्तीचे आव्हान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच नशामुक्त युवा संकल्प अभियानाची घोषणा केली. तरुणाईला संबोधित करताना त्यांनी अत्यंत मार्मिक आणि रोखठोक इशारा दिला.
'अंमली पदार्थ तुम्हाला काही काळासाठी नशा देऊ शकतात, परंतु ते तुमचे संपूर्ण आयुष्य आणि करिअर खालच्या पातळीवर नेतात' असे ते म्हणाले. पंतप्रधानांचे हे उद्गार देशातील सध्याच्या अत्यंत दाहक आणि चिंताजनक परिस्थितीवर ठेवलेले बोट आहे.
भारत जेव्हा 2047 पर्यंत एक विकसित राष्ट्र बनण्याचे स्वप्न पाहात आहे, तेव्हा देशाची सर्वात मोठी ताकद असलेली तरुणाई अंमली पदार्थांच्या दलदलीत अडकणे ही राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे. म्हणूनच, व्यसनाधीनतेच्या या भस्मासुराविरुद्ध पुकारलेले हे युद्ध ही आजच्या काळाची सर्वात मोठी आणि तातडीची गरज आहे. या अभियानाला जनभागीदारी म्हणजेच लोकचळवळीचे स्वरूप देण्यात आले असून, पुढील 100 आठवड्यांमध्ये दर रविवारी कला, क्रीडा, संस्कृती, योग आणि ध्यानाच्या माध्यमातून तरुणाईला जोडण्याचा संकल्प आखण्यात आला आहे. परंतु, या अभियानाचा मूळ गाभा आणि त्यामागचे भीषण वास्तव समजून घेणे गरजेचे आहे. अंमली पदार्थांची समस्या ही आता केवळ एखादी आरोग्यविषयक किंवा वैयक्तिक स्वरूपाची उरलेली नाही; ती भारताच्या सार्वभौमत्वावर आणि सुरक्षेवर झालेला थेट हल्लाही आहे.
भारत भौगोलिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आणि असुरक्षित अशा दोन मोठ्या अवैध अंमली पदार्थांच्या उत्पादक केंद्रांच्या मध्ये वसलेला आहे. एकीकडे इराण, अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि दुसरीकडे म्यानमार, लाओस, थायलंड. या भौगोलिक स्थानामुळे भारत केवळ या घातक पदार्थांचा ट्रान्सिट मार्ग राहिलेला नसून, तस्करांचे एक मोठे थेट ठिकाण बनला आहे.
पंजाबात पाकिस्तानकडून आणि ईशान्येकडील राज्यांत म्यानमारमधून होणारी अंमली पदार्थांची अनधिकृत आवक हा काही केवळ योगायोग नाही. हा आपल्या शत्रू देशांच्या 'नारको–टेररिझम' म्हणजेच अंमली पदार्थप्रणीत दहशतवादाचा एक भाग आहे. ड्रोन तंत्रज्ञान, सागरी मार्गाचा वापर करून हेरॉइन आणि कृत्रिम ड्रग्ज भारतात ढकलले जात आहेत. तरुण पिढीला आतून पोकळ करून राष्ट्राचे भवितव्य उद्ध्वस्त करणे, हा यामागील देशविघातक हेतू आहे. या संकटाचे स्वरूप दिवसेंदिवस अधिक जटिल होत चालले आहे. पूर्वी वनस्पती–आधारित पारंपरिक मादक पदार्थांचा वापर प्रामुख्याने दिसायचा; परंतु आता धोकादायक कृत्रिम सिंथेटिक पदार्थांचा उदय झाला आहे. एमडीएमए, क्रिस्टल मेथ, डिझायनर ड्रग्ज आणि डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांचा गैरवापर 15 ते 35 या वयोगटातील तरुणांमध्ये भयंकर प्रमाणात वाढला आहे.
सुयांद्वारे इंजेक्शनने अंमली पदार्थ घेण्याच्या वाढत्या प्रमाणामुळे एचआयव्ही आणि हिपॅटायटीससारख्या जीवघेण्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची जप्ती केली जात आहे. केवळ महानगरेच नव्हे तर अगदी ग्रामीण भागातही या पदार्थांचे व ते पोहोचवणार्यांचे जाळे पसरले आहे. या राष्ट्रीय संकटाचा सामना करताना आपल्याला प्रशासकीय आणि सामाजिक पातळीवरील त्रुटींकडे डोळेझाक करून चालणार नाही.
भारत सरकार आणि विविध राज्य सरकारे व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न करत असली, तरी प्रशासकीय पातळीवर अशा मोहिमांना अनेकदा केवळ सरकारी सोहळा मानले जाण्याचा धोका असतो. सरकारी अभियानांमध्ये जनतेचा उत्स्फूर्त सहभाग नसणे आणि अशा उपक्रमांवर राजकीय मतभेद उफाळून येणे ही दुर्दैवी अडचण आहे. व्यसनाधीनतेचा प्रश्न हा सत्ताधारी विरुद्ध विरोधक असा असूच शकत नाही.
जेव्हा एखादा तरुण व्यसनाच्या आहारी जातो, तेव्हा तो कुठल्या राजकीय पक्षाचा मतदार आहे हे पाहिले जात नाही. त्यामुळे, या अभियानाला सर्वपक्षीय सहकार्याची आणि व्यापक सामाजिक सहभागाची जोड मिळणे अनिवार्य आहे. विरोधी पक्षांनीही हा देशाचा आणि देशाच्या भविष्याचा प्रश्न आहे हे ध्यानात घेत त्यात सरकारच्या सोबत काम करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे, कोणत्याही निर्णयाची अंमलबजावणी आणि उपायांमधील अथवा कारवायांमधील तफावत दूर करणे हे सर्वात मोठे आव्हान आहे.
आपल्या कायदा अंमलबजावणी यंत्रणा अनेकदा मोठ्या आंतरराष्ट्रीय व आंतरराज्यीय तस्करांच्या मुख्य साखळीला उद्ध्वस्त करण्याऐवजी स्थानिक पातळीवरील लहान–सहान विक्रेत्यांना पकडण्यात धन्यता मानतात. मुख्य पुरवठादार आणि तस्करीची मुळे उखडल्याशिवाय ही साखळी तुटणार नाही. दुसरीकडे, व्यसनमुक्ती आणि पुनर्वसनासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची प्रचंड कमतरता आहे. हजारो तरुणांना क्लिनिकल उपचारांची गरज असताना, परवडणार्या आणि दर्जेदार पुनर्वसन केंद्रांची संख्या फारच तोकडी आहे.
सर्वात महत्त्वाची भूमिका ही समाज आणि कुटुंबाची आहे. अंमली पदार्थांच्या व्यसनाकडे एक सामाजिक कलंक म्हणून पाहिले जात असल्यामुळे अनेक कुटुंबे लोकलाजेस्तव लपवाछपवी करतात. ज्यामुळे व्यसनाधीन व्यक्तीला वेळेवर वैद्यकीय आणि मानसिक उपचार मिळत नाहीत.
समाजाने व्यसनी व्यक्तीला गुन्हेगार मानण्याऐवजी आजारी व्यक्ती म्हणून पाहून, व्यसनातून बाहेर पडणार्याला लढवय्या म्हणून स्वीकारले पाहिजे ही जी भूमिका पंतप्रधानांनी मांडली आहे ती योग्यच. पालकांनी मुलांशी मोकळा संवाद साधणे आणि शाळा–महाविद्यालयांनी जीवनमूल्यांचे धडे देणे काळाची गरज आहे.
केवळ कायदेशीर कारवाईने किंवा जप्तीचे आकडे दाखवून हा लढा जिंकता येणार नाही. पुरवठा रोखण्यासोबतच तरुणांमधील याची मागणी पूर्णपणे शून्य करणे हे ध्येय असले पाहिजे. जेव्हा देशातील तरुण स्वयंस्फूर्तीने अंमली पदार्थांना नाही म्हणायला शिकेल, तेव्हाच या अभियानाची खरी फलश्रुती होईल. पुढचे 100 रविवार हे केवळ दिनदर्शिकेवरील दिवस न ठरता, भारताच्या उज्ज्वल आणि नशामुक्त भविष्यासाठी टाकलेली 100 खंबीर पावले ठरावीत.

# भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकलेली नैतिकता

बनवाबनवी आणि अफरातफरी यामुळे समाज रसातळाला जात आहे. भ्रष्टाचाराची कीड शासनव्यवस्थेला पोखरत आहे. मेल्यावरच्या टाळूवरचे लोणी खाणार्यांनी उच्छाद मांडला आहे. ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाणारे भ्रष्टाचारी लोक गबरगंड होत आहेत. अशा काळात या लोकांचे पाठीराखेही तेवढेच दोषी ठरतात.

न्यायदेवतेच्या डोळ्यांवर पट्टी बांधलेली आहे, हे आपण सारे पाहतोच. ती न्याय देताना पुराव्यांची मागणी करते. सामान्य लोकांनी भरलेल्या कराच्या पैशातून अनेक शासकीय योजना कार्यान्वित केल्या जातात. या योजना गरीब, मागासवर्गीय आणि दिव्यांगांसाठी लाभदायक ठरतात. त्यांच्या शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि एकूणच सर्वांगीण उन्नतीसाठी या योजना आवश्यक आहेत. परंतु या योजनांमध्ये लागलेली भ्रष्टाचाराची कीड देशाच्या प्रगतीचा गाडा मागे ओढत आहे.

आजपर्यंत राबविण्यात आलेल्या एकाही शासकीय योजनेमध्ये भ्रष्टाचार झाला नाही, असे म्हणता येणार नाही. या योजनांमधून आपले उखळ पांढरे करून घेणारे अनेक जण जेलची हवा खाऊन पुन्हा बाहेर आले आहेत. काही जण मात्र स्वतःला धुतल्या तांदळासारखे समजून, स्वतःची भौतिक प्रगती स्वकष्टाने कमावल्याप्रमाणे तोर्यात मिरवताना दिसतात.

एखाद्या सामान्य नोकरी करणार्या अथवा मोलमजुरी करणार्या व्यक्तीला स्वतःच्या स्वप्नातील घर बांधण्यासाठी आयुष्यभर कष्ट करावे लागतात. परंतु एखादा अधिकारी अथवा लोकप्रतिनिधी आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या दोन–तीन वर्षातच लाखो रुपयांचे घर बांधून मोकळा होतो. शेतीवाडी, आलिशान गाड्या आणि उच्चभ्रू जीवनशैली यामुळे अल्पावधीतच असा व्यक्ती समाजात चुकीचा संदेश पसरवतो. माणसाची खरी प्रगती प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम आणि सन्मार्गाने होत नाही, तर 'या बोटावरची थुंकी त्या बोटावर कळविण्यातच खरी हुशारी आहे,' असा गैरसमज समाजात पसरवण्यात तो यशस्वी होतो.

समाजाची नैतिक प्रगती झाली पाहिजे, हा विचार साधुसंतांपासून ते महापुरुषांपर्यंत सर्वांनी मांडला आहे. नैतिक प्रगती म्हणजे सद्विचार, सद्वर्तन आणि सन्मार्गाची कास धरून पुढे जाणे होय.

आधुनिक काळात पैसा हे विनिमयाचे साधन आहे. सेवा आणि उत्पादने लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पैसा हे एक माध्यम आहे. मात्र, अनेकांनी अधिकाधिक उत्पादने आणि सेवा मिळवणे हेच जीवनाचे अंतिम ध्येय मानले आहे. यातून पैशाला जीवनात अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे.

''हेराफेरी' सिनेमांमध्ये अक्षय कुमार सतत म्हणत असतो, "मै पैसा कमाने के लिए कुछ भी कर सकता हु!'' आज हीच अवस्था बहुतेक सार्या लोकांची झाली आहे. आज मात्र पैशासाठी काहीही करण्याची मानसिकता समाजातील अनेक स्तरांमध्ये दिसून येते. खिशात पैसे आल्यानंतर मिळणारे भौतिक समाधान हेच उच्च प्रतीचे समाधान मानून जगणारे लोक जीवनातील अनेक साध्या, निरागस आणि आत्मिक समाधान देणार्या गोष्टींपासून दूर जात आहेत.

भ्रष्ट लोकांच्या पैशाच्या या कुंभकर्णी भुकेवर उपाय सुचवणे आजच्या काळात कठीण झाले आहे. आकाशाची उंची मोजता येत नाही किंवा आकाशातील चांदण्या मोजता येत नाहीत; त्याप्रमाणे अवैध मार्गाने पैसा मिळवण्याची या लोकांची क्षमता मोजणेही शक्य होत नाही. अनेक वेळा आपण वृत्तपत्रांत किंवा दूरचित्रवाणीवरील बातम्यांमध्ये ऐकतो की, एखाद्या व्यक्तीची अवैध मार्गाने मिळवलेली संपत्ती मोजता–मोजता मोठ्या नोटा मोजण्याची यंत्रेही बिघडली! अशी बातमी ऐकल्यानंतर त्या व्यक्तीच्या संचयवृत्तीवर हसावे की आपल्या सामान्य माणसांच्या शोषणावर रडावे, हेच सुचत नाही.

लोकांना सेवा देण्याच्या नावाखाली तयार झालेले माफिया आज पांढरे शुभ्र कपडे घालून आणि पिवळेधमक सोने परिधान करून सामान्य लोकांच्या सन्मार्गाविषयीच्या समजुतींचे गैरसमजात रूपांतर करत आहेत. शिक्षण माफिया विद्यार्थ्यांचे नुकसान करत आहेत. आरोग्य माफिया सामान्यांच्या आरोग्याशी खेळत आहेत. वाळू माफिया पर्यावरणाला ओरबाडत आहेत. माफियाराज आणू पाहणार्या व्यवस्थेविरुद्ध आवाज उठविणार्यांचा आवाज दाबला जात आहे.

अशा काळात खरी गोची होते ती संवेदनशील आणि प्रामाणिक माणसांची. त्यांना कोणता मार्ग स्वीकारावा, कोणता झेंडा हाती घ्यावा आणि कोणते आदर्श डोळ्यांसमोर ठेवावेत, हेच समजेनासे होते. कारण चुकीच्या मार्गाने जाणार्यांना मिळणारे यश आणि प्रामाणिकपणे जगणार्यांना भोगावा लागणारा संघर्ष यातील विरोधाभास त्यांच्या मनाला अस्वस्थ करतो. परंतु परिस्थिती कितीही बिकट असली तरी भ्रष्टाचाराला शरण जाणे हा पर्याय असू शकत नाही.

भ्रष्टाचाराविरुद्धची लढाई केवळ शासनाची किंवा कायद्याची नाही; ती प्रत्येक जागरूक नागरिकाची जबाबदारी आहे. अन्याय करणार्याइतकाच अन्याय सहन करणारा आणि त्याला पाठिंबा देणारा समाजही जबाबदार असतो. म्हणूनच बदलाची सुरुवात इतरांकडून होण्याची वाट न पाहता स्वतःपासून झाली पाहिजे. भ्रष्टाचाराचा अंधार कितीही गडद असला, तरी प्रामाणिकपणाची एक ज्योतही परिवर्तनाची सुरुवात करू शकते.



– किशोर जाधव, सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# सोलापूर जिल्ह्यात आणखी एक नगरपंचायत होणार?

## कोल्हापूर सर्किट बेंचचा 'करकंब'बाबत महत्वपूर्ण निर्देश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर जिल्ह्यात सध्या सहा नगरपंचायती असून त्यात आणखी एका नगरपंचायतीची भर पडण्याची शक्यता आहे. कारण, पंढरपूर तालुक्यातील करकंब ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायतीमध्ये करण्याबाबत तीन महिन्यांत निर्णय घेण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने राज्य सरकारला दिले.

करकंब नगरपंचायत करण्यासाठी येथील बाळासाहेब मारुती देशमुख, अमोल अभिमान शेळके, पांडुरंग रामचंद्र शेटे व लक्ष्मण वंजारी यांनी जनहित याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर निर्णय देताना कोल्हापूर सर्किट बेंचचे न्यायमूर्ती मिलिंद एन. जाधव आणि न्यायमूर्ती नंदेश एस. देशपांडे यांनी तीन महिन्यांत कायद्यानुसार अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश राज्य सरकारच्या नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांना दिले आहेत.

करकंब हे पंढरपूर तालुक्यातील सर्वाधिक विकसित गावांपैकी एक असून २०११ च्या जनगणनेनुसार १७ हजार ४५६ लोकसंख्या आहे. हे गाव आसपासच्या २६ गावांचे सेवा केंद्र, तसेच शिक्षण, आरोग्य, बँकिंग, कृषी व्यापार, व्यापारी व्यवहार व शासकीय सेवांचे प्रमुख केंद्र असल्याचे जनहित याचिकेतून निदर्शनास आणून देण्यात आले होते. उच्च न्यायालयाने या बाबींची नोंद घेत या प्रस्तावावर तीन महिन्यांत निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत.

याचिकाकर्त्यांच्या वतीने २०१७ पासून नगरपंचायतीचा निर्णय प्रलंबित असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. याशिवाय ग्रामसभेच्या ठरावापासून सुरू झालेली संपूर्ण प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तहसीलदार, गटविकास अधिकारी,




नगररचना विभाग, जिल्हा सांख्यिकी अधिकारी, उपविभागीय अधिकारी, आदी सर्व संबंधित अधिकार्यांच्या अहवालांनंतर जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी ९ एप्रिल २०२५ रोजी नगर विकास विभागाकडे अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव पाठविला. मात्र सरकारकडून कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आला नाही.

यावर उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदविले की, जिल्हाधिकार्यांनी प्रस्तावाची शिफारस करून सरकारकडे पाठविल्यानंतरही दीर्घकाळ कोणतीही कार्यवाही झालेली नाही. अशा परिस्थितीत ग्रामस्थांना जनहित याचिका दाखल करावी लागली. करकंबच्या वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सोयी–सुविधा, सार्वजनिक विकास आणि स्थानिक प्रशासनाच्या दृष्टीने प्रस्तावावर विलंब न करता निर्णय होणे आवश्यक आहे.

जिल्हा प्रशासनाने प्रस्तावाची शिफारस केल्यानंतर तो अनिश्चित काळ प्रलंबित ठेवण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. त्यामुळे या प्रस्तावावर तीन महिन्यांच्या आत कायद्यानुसार अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच काही त्रुटी असल्यास त्या तात्काळ संबंधित अधिकार्यांकडून पूर्ण करून घ्याव्यात; मात्र न्यायालयाने निश्चित केलेली तीन महिन्यांची मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढविता येणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# आरोग्य विभागाची चौदा आयुष्मान आरोग्य मंदिरांना राष्ट्रीय NQAS प्रमाणपत्र

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (NHM) आरोग्य संस्थांच्या दर्जा आणि सुविधांची पाहणी करून राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन (National Quality Assurance Standards - NQAS) प्रदान करण्यात येते. राष्ट्रीय ठदअर मूल्यांकन हे आरोग्य सेवेतील गुणवत्ता, रुग्णकेंद्रित सेवा, सुरक्षितता, स्वच्छता, व्यवस्थापन आणि प्रभावी सेवा वितरण यांचे राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च मानांकन मानले जाते.

आज जाहीर झालेल्या राष्ट्रीय NQAS मूल्यांकनाच्या निकालात सोलापूर जिल्ह्यातील चार आयुष्मान आरोग्य मंदिरांनी (AAM) उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता मानांकन यशस्वीरित्या संपादन केले आहे. सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभागाने आज अखेर जिल्ह्यात एकुण चौदा आयुष्मान आरोग्य मंदिरांना हा बहुमान मिळविला आहे.

**प्रमाणपत्र प्राप्त आयुष्मान आरोग्य मंदिरे (उपकेंद्रे):**

१) आयुष्मान आरोग्य मंदिर, विजोरी ( 86.92%)

२) आयुष्मान आरोग्य मंदिर श्रीपत पिंपरी – (84.36%)

३) आयुष्मान आरोग्य मंदिर, लिंबिचिचोळी (80%)

४) आयुष्मान आरोग्य मंदिर–रातंजन (84.93%)

**NQAS मानांकनाचे प्रमुख लाभः**

गुणवत्तापूर्ण व सुरक्षित आरोग्यसेवाः या मानांकनामुळे उपकेंद्र स्तरावर रुग्णकेंद्रित, सुरक्षित, संसर्गमुक्त आणि अत्यंत दर्जेदार आरोग्यसेवा अधिक बळकट होण्यास मदत होईल.

प्रशासकीय सुधारणाः आरोग्य केंद्रांमधील सेवा वितरण, रुग्ण सुरक्षा, औषध व आधुनिक उपकरण व्यवस्थापन, नोंदवही व्यवस्थापन तसेच रुग्णांच्या समाधानात सातत्याने वाढ होईल.

गुणवत्ता प्रोत्साहन निधी (Incentive Fund): मानांकन प्राप्त संस्थांना राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विशेष प्रोत्साहन निधी मिळण्यास पात्रता प्राप्त होते. या निधीचा वापर पायाभूत सुविधा, आधुनिक वैद्यकीय उपकरणे आणि रुग्णसुविधा अधिक मजबूत करण्यासाठी केला जाईल.

ग्रामीण भागाला मोठा फायदाः ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावातच विश्वासार्ह, मोफत आणि उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध होतील.

हे यशामागे सोलापूर चे पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार व मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन व आरोग्य सभापती चेतनसिह केदार सावंत समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते, कृषी व संवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला बाल कल्याण समितीचे सभापती अमृता वाघे व पालकअधिकारी उपसांचलक डॉ भगवान पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व नियंत्रणात तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ. मोहन शेगर आणि जिल्हा माता–बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल जाधव व जिल्हा समन्वयक निखिल फताटे व यांची टीम च्या अथक प्रयत्न व कायार्मुळे सक्षम नेतृत्वामुळे शक्य झाले आहे.

हे यश जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी (CHO), आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविका यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि आशा स्वयंसेविकांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे. तसेच, भविष्यात जिल्ह्यातील अधिकाधिक आरोग्य संस्थांनी राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन प्राप्त करण्यासाठी सातत्याने प्रयत्न शील राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व संबंधित अधिकारी कर्मचारी अशा स्वयंशिकांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे, तसेच भविष्यातील सर्व आरोग्य संस्था या राष्ट्रीय गुणवत्ता मानांकनासाठी प्राप्त होतील यासाठी प्रयत्नशील राहावे असे आवाहन सर्व माननीय महोदय यांनी केले आहे व तसेच अभिनंदन पण केले

> आज पर्यंत जिल्ह्यातील 14 आरोग्य संस्था qualified झाल्या असून आणखी सर्व आरोग्य संस्थेचे ठदअर मानांकन प्राप्त करण्याचा मानस असून जनतेला दर्जेदार व सुरक्षित आरोग्य सेवा देण्यासाठी प्रयत्न राहील
>
> – **कुशल जैन,**
> मुख्य कार्यकारी अधिकारी,
> जिल्हा परिषद सोलापूर.

# मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याकडून चंद्रभागा घाट व श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसराची पाहणी



**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज पंढरपूर दौर्यादरम्यान चंद्रभागा नदी घाट तसेच श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर परिसराची पाहणी केली. यावेळी प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी त्यांचे स्वागत केले.

**चंद्रभागा घाट परिसराची पाहणी**

मुख्य सचिव अग्रवाल यांनी प्रथम चंद्रभागा घाट परिसराची पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी नदीपात्र स्वच्छता, भाविकांसाठी स्नान सुविधा, प्रकाश व्यवस्था तसेच घाटावरील सुरू असलेल्या विविध विकासकामांची माहिती दिली. आषाढी–कार्तिकी वारीतील भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याच्या उपाययोजनाबाबत सूचना दिल्या. तसेच यावर्षीच्या आषाढी वारीमध्ये स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देऊन भाविक, वारकर्यांना प्रशासनाच्या वतीने कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही अशा पद्धतीने सुविधा उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले.

**श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर परिसर व प्रस्तावित कॉरिडॉर**

त्यानंतर अग्रवाल यांनी श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर परिसराची पाहणी केली. यावेळी तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत 73 कोटीच्या निधीतून झालेल्या मंदिर विकास, सुशोभिकरण कामांची पाहणी ही त्यांनी केली. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी प्रस्तावित श्री क्षेत्र पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्पाबाबत माहिती दिली. यामध्ये मंदिर परिसरातील भाविकांसाठी सुलभ दर्शन मार्ग, प्रशस्त प्रदक्षिणा मार्ग व अत्याधुनिक सुविधा तसेच भक्त निवास, बहुमजली पार्किंग, प्रसादालय, माहिती केंद्र, वैद्यकीय मदत कक्ष, वृद्ध व दिव्यांगांसाठी विशेष मार्ग. सुरक्षा व नियोजनः गर्दी व्यवस्थापनासाठी स्वतंत्र प्रवेश–निर्गम मार्ग, सीसीटीव्ही व अग्निशमन यंत्रणा. आदी विषयी सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच आषाढी यात्रा कालावधीत पालखी मार्ग व पंढरपूर शहर व परिसरात गर्दी नियंत्रणासाठी व वाहतूक नियमासाठी पोलीस प्रशासनाकडून वापरण्यात आलेल्या ए.आय तंत्रज्ञानाबाबतची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिली.

प्रस्तावित विकासकामे, भाविकांच्या सुविधा आणि परिसराच्या एकात्मिक नियोजनाबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्य सचिवांनी प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी व समन्वयाबाबत संबंधित अधिकार्यांना सूचना दिल्या.

**विठ्ठल–रुक्मिणीचे दर्शन**

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सपत्नीक श्री विठ्ठल–रुक्मिणीचे दर्शन घेऊन राज्यातील शेतकरी व भाविकांच्या सुख–समृद्धीसाठी प्रार्थना केली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी मुख्य सचिव अग्रवाल यांचा सत्कार केला.

यावेळी नगराध्यक्षा प्रणिता भालके, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, प्रांत अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीण घम यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# ऑटो रिक्षा चालकांकडून अवाजवी भाडे व गैरवर्तणूक झाल्यास तात्काळ तक्रार करा –विजय पाटील

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर शहर व परिसरातील प्रवाशांनी ऑटो रिक्षा प्रवासादरम्यान चालकांकडून होणार्या अवाजवी भाडे आकारणी, प्रवास नकार अथवा गैरवर्तणुकीच्या तक्रारी तात्काळ नोंदवाव्यात, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

नियमानुसार ठरवून दिलेल्या भाड्यापेक्षा जास्त भाडे मागणे, प्रवाशांना इच्छित ठिकाणी नेण्यास नकार देणे तसेच प्रवाशांशी असभ्य वर्तन करणे, अशा तक्रारींच्या निवारणासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांच्यामार्फत विशेष तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

तक्रार नोंदविताना ही माहिती द्या

प्रवाशांनी संबंधित रिक्षाचा वाहन क्रमांक, घटनेची वेळ, ठिकाण आणि घटनेचा तपशील यासह खालील अधिकृत संपर्कावर तक्रार नोंदवावी.

– ई–मेलः mh13@mahatranscom.in / dyrto.13-mh@gov.in
– दूरध्वनीः 0217–2303099
– मोबाईलः 9420564513

प्रवाशांकडून प्राप्त होणार्या तक्रारींची तात्काळ दखल घेऊन संबंधित प्रकरणाची पडताळणी करण्यात येईल. तक्रार सिद्ध झाल्यास संबंधित रिक्षा चालकावर मोटार वाहन कायद्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्यामुळे सोलापूर शहर व परिसरातील सर्व रिक्षा प्रवाशांनी अशा प्रकारच्या गैरप्रकारास बळी पडल्यास तक्रार निवारण यंत्रणेचा प्रभावीपणे वापर करावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# यशवंतराव चव्हाण (यमाई) तलावात पाणी सोडण्यास सुरुवात

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):–** उजणी जलाशय पूर्ण क्षमतेने भरलेले असून जलाशयातील अतिरिक्त पाणी भीमा नदीपात्रात सोडण्यात येत होते पार्श्वभूमीवर पंढरपूर–सांगोला रोड परिसरातील नागरिकांसाठी तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेला यशवंतराव चव्हाण तलाव (यमाई) तलाव पूर्ण क्षमतेने भरून देण्यात यावा, अशी मागणी पंढरपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा डॉ. सौ. प्रणिता भगीरथ भालके यांनी पाटबंधारे विभागाकडे केली होती. मगणीची दखल घेत संबंधित अधिकारी यांनी तातडीने तलाव भरून देणेबाबत आदेश दिले.

यशवंतराव चव्हाण तलाव हा पंढरपूर शहर व परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा जलस्रोत मानला जातो. तसेच पर्यटणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा तलाव आहे. सध्या तलावामध्ये अपेक्षित प्रमाणात पाणीसाठा नसल्याने परिसरातील नागरिकांना विंधन विहिरी यांना, बोअरवेल याची पाणी पातळी खालावली होती. त्यामुळे नागरिक व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा अडचणी प्रश्न निर्माण झाला होता. तलाव मध्ये पाणी साठा नसल्याने नगिरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे असे निवेदनात नगराध्यक्षा भालके यांनी म्हणले होते.

या यशवंतराव चव्हाण तलावावर परिसरातील विहिरी, बोअरवेल्स तसेच इतर जलस्रोतांच्या पाणीपातळीत वाढ होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर परिसरातील शेती, पशुधन आणि नागरिकांच्या पाण्याच्या गरजा भागविण्यास मोठा हातभार लागणार आहे. तलावात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध झाल्यामुळे परिसरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यास तसेच जलचर व पक्ष्यांसाठी पोषक वातावरण निर्माण होण्यासही मदत होणार आहे.

## वात्रटिका

### बनावट आणि भेसळ

कुठे कुठे लक्ष ठेवणार
चहुकडे सारेच बनावट...
फोडणी बसली आधीच
आणि कळले ते तेलकट...
अज्ञानात सुख होते, आता
उगाच धाकधूक वाढली...
जीवाशी खेळ मांडला आणि
पैशासाठी त्यांनी लाज सोडली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# कर्जमुक्ती योजनेच्या लाभ वितरणास प्रारंभ; प्रत्येक पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळणार- मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळणार असून, शेतकरी सक्षम, शेती समृद्ध आणि महाराष्ट्र अधिक प्रगत करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने ही महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, योजनेच्या पहिल्या टप्प्यात ६.२२ लाख पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ५,०२८ कोटींची रक्कम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट ऑनलाइन हस्तांतरित करण्यात आली.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन लाभ वितरणास प्रारंभ करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे तसेच सहकार आयुक्त दीपक तावरे उपस्थित होते. तसेच सर्व पालकमंत्री,



जिल्हाधिकारी आणि सहकारी संस्थांचे निबंधक दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पहिल्या टप्प्यात आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या ६.२२ लाख शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ५,०२८ कोटींची रक्कम थेट जमा करण्यात आली आहे. राज्य शासनाने सर्व बँकांना कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून शेतकऱ्यांना नव्याने शेतीसाठी आवश्यक आर्थिक बळ मिळेल.

ही योजना पूर्णपणे ऑनलाइन असून, शेतकऱ्यांना कुठेही अर्ज करण्याची आवश्यकता नाही. योजनेतील पात्र लाभार्थ्यांची यादी संबंधित बँकांनी महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली असून, ग्रामपंचायत कार्यालये, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था तसेच संबंधित बँक शाखांमध्येही प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीतील प्रत्येक शेतकऱ्याला एक विशिष्ट क्रमांक देण्यात आला आहे. हा क्रमांक घेऊन शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर ॲग्रीस्टॅकवरील नोंदणी करून आधार प्रमाणीकरण करावे. एवढीच सहज आणि सोपी प्रक्रिया असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

ज्या जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या अडचणी अथवा प्रलंबित बाबी असतील, त्या संबंधित पालकमंत्र्यांनी निदर्शनास आणुन द्यावे त्या सर्व विषयांवर मंत्रिमंडळ उपसमितीमध्ये सविस्तर चर्चा करून सकारात्मक निर्णय घेतला जाईल. अशा सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

या योजनेतील कर्जमुक्ती आणि एकवेळ समझोता या घटकांच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील ३० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, १२ राष्ट्रीयकृत बँका आणि इतर खासगी बँकांसह एकूण ५३ बँकांनी महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. विविध बँकांकडून सुमारे ३२ लाख कर्जखात्यांचा डेटा पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आला असून, ६ ऑगस्ट २०२६ अखेर १२.१० लाख कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्याची माहिती सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी सादरीकरणाद्वारे दिली.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पहिल्या टप्प्यात विभागनिहाय माहिती**

- अमरावती विभागात १ लाख ५८ हजार १४६ शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात १,३७२.१७ कोटींचा लाभ,
- नाशिक विभाग- १ लाख ४० हजार ८९ शेतकऱ्यांना १,२०९.३९ कोटी रुपये,
- छत्रपती संभाजीनगर विभाग- १ लाख ३० हजार ९३४ शेतकऱ्यांना ९३२.६१ कोटी रुपये,
- पुणे विभाग- १ लाख ४ हजार ६१ शेतकऱ्यांना ८६०.९७ कोटी रुपये,
- नागपूर विभाग- ७० हजार २९० शेतकऱ्यांना ५४४.७१ कोटी रुपये,
- कोकण विभागातील १८ हजार ६८७ शेतकऱ्यांना १०८.८६ कोटीं रुपयांचा लाभ.

# खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपातील आरोपीस न्यायालयाकडून जामीन मंजूर

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** बंदूक व कोयत्याचा वापर करून खुनाचा प्रयत्न केल्याचा आरोप असलेल्या प्रकरणातील आरोपी प्रदीप मारुती कदम (रा. कंदर, ता. करमाळा) यास बार्शी येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. या जामीन अर्जावर जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांच्या न्यायालयात सुनावणी होऊन दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजी आरोपीची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश देण्यात आले.

या प्रकरणातील फिर्यादी आणि आरोपी हे एकाच गावातील रहिवासी असून, किरकोळ कारणावरून झालेला वाद पुढे विकोपाला गेल्याचा आरोप आहे. फियार्दीच्या तक्रारीनुसार, आरोपी प्रदीप कदम याने बंदूक व कोयत्याच्या साहाय्याने जीवे मारण्याचा प्रयत्न केला तसेच जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानुसार करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४३९/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०९(१) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत दि. २० मे २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

आरोपीच्या वतीने ॲड. गोपाळ परबत-पाटील यांनी बार्शी जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. सुनावणीदरम्यान सरकार पक्षाने आरोपी सुमारे एक महिना फरार होता, त्याने बंदूक आणि कोयत्याने फियार्दीचा खून करण्याचा प्रयत्न केला तसेच जातीवाचक शिवीगाळ केल्याचा युक्तिवाद केला. त्यामुळे जामीन अर्ज फेटाळण्याची मागणी करण्यात आली.

यास प्रत्युत्तर देताना आरोपीचे वकील ॲड. गोपाळ परबत-पाटील यांनी न्यायालयात सविस्तर युक्तिवाद



केला. त्यांनी आरोपी घटनास्थळी उपस्थित होता की नाही, याबाबतच शंका उपस्थित केली. तसेच फियार्दी आणि आरोपी हे एकाच जातीचे असल्याने आरोपीने जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप प्रथमदर्शनी ग्राह्य धरता येत नाही, असा मुद्दा मांडला.

याशिवाय, फियार्दीला जीवे मारण्याची भीती असल्याचा दावा करण्यात आला असला तरी, त्याने नातेवाईकांशी चर्चा करून विलंबाने तक्रार दाखल केल्याकडेही बचाव पक्षाने न्यायालयाचे लक्ष वेधले. गुन्हा दाखल झाल्यानंतर तब्बल २० दिवसांनी तपास यंत्रणांनी इतर कलम १०९(१) (पूर्वीच्या भारतीय दंड संहितेतील कलम ३०७ अर्थात खुनाचा प्रयत्न यासम) लागू करून गुन्ह्याचे स्वरूप अधिक गंभीर दाखविण्याचा प्रयत्न केल्याचा दावा बचाव पक्षाने केला.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद, तपासातील कागदपत्रे आणि प्रकरणातील परिस्थितीचा विचार करून जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांनी आरोपी प्रदीप मारुती कदम यास जामीन मंजूर करत जामिनावर मुक्त करण्याचे आदेश दिले.

या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. गोपाळ परबत-पाटील, ॲड. अभिजित साखरे, ॲड. के. के. मांगले आणि ॲड. निखिल घाडगे यांनी काम पाहिले, तर सरकार पक्षातर्फे ॲड. डी. डी. देशमुख यांनी न्यायालयात बाजू मांडली.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**कार्यकारी अभियंता (विद्युत) विभाग, सोलापूर यांचे कार्यालय**
**९१६, सिव्हिल लाईन राष्ट्रीय महामार्ग वसाहत, सोलापूर ४१३००३**

जावक.क्र.का.अ./निविदा/१३७७/२०२६ — दूरध्वनी क्रमांक. (०२१७) २३१२८९४
दिनांक- २०/०७/२०२६ — Email ID- elsolapur.ee@gmail.com,elsolapur.ee@mahapwd.gov.in

**ई- निविदा सुचना क्र. ०४/२०२६-२७**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम सोलापूर विद्युत विभाग सोलापूर हे B -1 (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई - निविदा प्रणालीद्वारे ऑनलाइन मागवित असून कंत्राटदाराचे वर्गाविषयीची माहिती निवेदेत नमूद करण्यात आली आहे. निविदा कागदपत्रे शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाउनलोड करण्यात यावी तसेच निविदा करण्याचा अथवा न करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम सोलापूर विद्युत विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| Sr. No | Estimate No & Name of work | Tender Amount |
|---|---|---|
| 1) | Est No. 133007 of 2026-2027 - Providing Street light, cable to pump room, Solar High mast, Submersible Pump, Switch gear in Workshop, EI in Admin Building, El in Workshop & APFC panel at Government ITI College Mandrup, Tal- South Solapur, Dist - Solapur | 23,35,873/- (Rs. Twenty-Three Lakh Thirty-Five Thousand Eight Hundred Seventy-Three/-) |
| 2) | Est No. 133074 of 2026-2027 Providing EI, Switchgears, Borewell Pump, Fire Extinguisher, Street light, AC & CCTV to New Judicial Residential Quarters at Akkalkot, Tal - Akkalkot, Dist- Solapur | 20,07,274/- (Rs. Twenty Lakh Seven Thousand Two Hundred Seventy-four) |

१. निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ११/०८/२०२६ ते दिनांक १८/०८/२०२६
२. निविदा पुर्व बैठक व स्थळ :- निरंक
३. ई -निविदा उघडणे :- दिनांक २०/०८/२०२६ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम सोलापूर विद्युत विभाग सोलापूर, यांचे कार्यालय, ९११, सिव्हील लाईन, राष्ट्रीय महामार्ग वसाहत, सोलापूर- ४१३००३
खालील संकेतस्थळावर ई- निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.
(www.mahatenders.gov.in)
सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळिवण्यात येईल.

**सही/-**
**(श्री.सु.गुजरे)**
**कार्यकारी अभियंता**
**सोलापूर सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, सोलापूर**

प्रसिध्दीकरिता तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम सोलापूर विद्युत विभाग, सोलापूर या कार्यालयाचे सुचना फलक.

जिमाका/सो/जाहि/९९/२६-२७

# 'एआय'च्या युगात स्वतःची बुद्धिमत्ता आणि गुणवत्ता जपा : प्राचार्य डॉ. शंकर नवले



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** "आयुष्यात पुढे जाण्यासाठी आई-वडिलांचे संस्कार आणि शिक्षकांचे प्रोत्साहन अत्यंत महत्त्वाचे असते. आज प्रत्येक क्षेत्रात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढतो आहे. दहा माणसांचे काम एक मशीन करत असल्याने विद्यार्थ्यांनी नवे तंत्रज्ञान आत्मसात केलेच पाहिजे. परंतु, तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी प्रत्येक ठिकाणी माणसांची गरज राहणारच आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेसोबतच विद्यार्थ्यांनी आपल्या स्वतःच्या बुद्धिमत्तेचा आणि गुणवत्तेचा वापर केला पाहिजे," असे प्रतिपादन एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी केले.

सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँक लि., सोलापूर यांच्या वतीने सहकारमहर्षी कै. वि. गु. शिवदारे स्मृती समारोह अंतर्गत १० वी आणि १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि मार्गदर्शन सोहळा हिराचंद नेमचंद वाचनालय संकुलातील लोकमान्य टिळक सभागृहात पार पडला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नवले बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी समर्थ सह. सुत गिरणीचे चेअरमन राजशेखर शिवदारे हे होते.

आपला शैक्षणिक प्रवास उलगडताना प्राचार्य डॉ. नवले म्हणाले, "मी स्वतः जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकलो आणि आज शिक्षणाच्या निमित्ताने २० देशांमध्ये फिरलो आहे. विद्यार्थ्यांनी आपली आवड ओळखूनच करिअरचा विचार करावा. नव्या तंत्रज्ञानाचा वापर कशासाठी आणि किती करावा, याला मयार्दा हवी. एखादे काम करण्यासाठी एआय मदत करेल, पण जीवनात प्रत्येक ठिकाणी एआय मदतीला येईल असे नाही. आपण आयुष्यात किती कमावले यापेक्षा केलेल्या कामातून किती आनंद मिळाला याचा विचार करा आणि नेहमी सकारात्मक राहा."

कृत्रिम बुद्धिमत्तेसोबत आपली बुद्धमत्ता सुद्धा कायम वापरत राहिली पाहिजे, याचा प्रत्येकाने प्रयत्न करावा. रोजच्या दैनंदिन आयुष्यात आवश्यक तेव्हा आपल्या बुद्धिमत्तेचा वापर करत राहिला पाहिजे. नव्या तंत्रज्ञानाचा वापर कशासाठी आणि किती करावा याला सुद्धा मयार्दा पाहिजे, असेही प्राचार्य डॉ. नवले यावेळी म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात राजशेखर शिवदारे म्हणाले, "शिक्षण क्षेत्रातील जीवघेणी स्पर्धा थांबली पाहिजे. पालकांनी मुलांच्या करिअरची अतिचिंता न करता त्यांना त्यांच्या आवडीनुसार करिअर निवडण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. पालकांनी आपले विचार विद्यार्थ्यांवर लादू नयेत. एआयचे भविष्यातील परिणाम काय होतील हे आताच सांगता येणार नाही, परंतु विद्यार्थ्यांनी आपली बुद्धिमत्ता कायम गुणवत्तापूर्ण ठेवली पाहिजे."

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभिरे यांनी प्रास्ताविकातून संवाद साधला. मंचावर व्हा. चेअरपर्सन सुचेता थोबडे, माजी अध्यक्ष प्रकाश वाले, व्यवस्थापक राम शर्मा, बँकेचे सीईओ संजय घाळे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रमोद नारायणकर यांनी केले

कार्यक्रमाला बँकेचे समस्त संचालक मंडळ, बँकेचे सभासद, गुणवंत विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## Classified - छोटी जाहीरात

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क -
शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस
रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आईची बहीण २) अंतराळ कक्षेतील वाहन ३) पाच गुणिले सहा ४) राष्ट्रवादीचे संस्थापक ५) शर्थ, नियम ६) नाकाने ओढतात ती तंबाखूची पूड ९) नगरपालिकेवर निवडून दिलेला लोकप्रतिनिधी १०) बंडखोर स्वभावाचे नेते-नारायण ** १२) दुर्ग, किल्ला १३) शिवकालीन लढाईची पध्दत-गनिमी ** १४) सणादिवशी करतात तो गोड खाद्यपदार्थ १५) भिंतीवरील सरपटणारा प्राणीजीव १७) दह्यापासून बनवितात ते पेय १८) छोटी चारचाकी प्रवासी गाडी २०) एखाद्याला वश करण्याचे उपाय-** ** ** भेद २१) हनुमानाच्या उपासनेचा वार २२) फलंदाजाने बनविलेल्या शंभर धावा २३) वस्तूंची संख्या २५) ध्यास, घेतला ** टाकू नये २६) वरल्या मनाने २८) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक-** शास्त्री ३०) तरचा जोडीदार ३२) हस्त, कर ३३) कागदी चलन ३४) एक म्हण-*** जीव सदाशिव ३५) देवांचा राजा ३६) गती ३७) मुरली, बासरी ३८) तीन दुणे ३९) एक कडधान्य

**आडवे शब्द :** १) युपीच्या माजी महिला मुख्यमंत्री, बसपा सुप्रिमो ४) ऐंशीच्या दशकातील एक अभिनेता -*** सिन्हा ५) मुलाचे एक नाव ७) एक (इंग्रजीत) ८) उन्हाळा (इंग्रजीत) ९) बोल्टचा साथीदार ११) प्रवासाने होणारा त्रास १३) काकाची पत्नी १४) शनिवारवाडा या शहरात आहे १५) उडिदाच्या पिठापासून लाटून बनवितात ते १६) शासकीय कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा दिवस १७) धातूचा बारीक तंतू १८) गोंधळ, गोंगाट १९) मनाने मजबूत २०) हळू, मंद गतीने २३) मीठ (हिंदीत) २४) चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा अंतराळवीर-** आर्मस्ट्राँग २५) उन्हाळ्यात वादळी वाऱ्यासह पडणारा पाऊस २७) बजरंगबलीच्या हातातील आयुध २८) याच्यापासून शिरा बनवितात २९) परीट, धोबी ३१) एक थोर जैन संत ३३) गुलाम, सेवक ३४) श्रीगणेशाचे एक नाव ३६) हॉटेलमधील सेवक ३७) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात ३८) सागर, दर्या ४०) एक द्विदल कडधान्य ४१) स्वस्तच्या विरूध्दार्थी

## सुडोकु - 26

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | 8 | | 7 | | | | 2 |
| | 4 | | | 6 | 2 | | 9 | 8 |
| 2 | 9 | 1 | | 3 | | 7 | | |
| | | 6 | 9 | | | 4 | | 7 |
| 3 | 2 | | 6 | | | | 1 | 5 |
| | 7 | | 2 | 5 | 4 | 6 | | 3 |
| | | | 8 | 9 | 1 | 2 | | 6 |
| | | | | 2 | | | 4 | |
| | | | | | | 8 | | 1 |

# सिटूच्या 'जेल भरो'ने सोलापूर दणाणले! स्मार्ट मीटरविरोधात हजारो कामगार रस्त्यावर; ४०० आंदोलक ताब्यात



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** स्मार्ट मीटरचा निर्णय रद्द करावा, चार श्रमसंहिता रद्द कराव्यात, कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, विडी कामगारांना कायदेशीर किमान वेतन व रोख मजुरी द्यावी, वाढती महागाई व बेरोजगारी रोखावी, पेट्रोल, डिझेल व गॅसच्या वाढत्या किमती कमी कराव्यात, तसेच आरोग्य व शिक्षणावरील वाढता खर्च कमी करावा, या मागण्यांसाठी सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सिटू) च्या वतीने सोमवारी सोलापुरात जोरदार 'जेल भरो' आंदोलन करण्यात आले. हजारो कामगारांनी लाल झेंडे हातात घेत रस्त्यावर उतरत शांती चौक परिसर दणाणून सोडला.

'जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले, तर जनतेचा आक्रोश आणखी तीव्रतेने रस्त्यावर दिसेल. हे जनतेचे सरकार नसून अदानी-अंबानींचे सरकार आहे,' अशी घणाघाती टीका सिटूचे राज्य उपाध्यक्ष, ज्येष्ठ कामगार नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी केली.

सिटूचे राज्य उपाध्यक्ष कॉ. नरसय्या आडम (मास्तर), राज्य महासचिव कॉ. एम. एच. शेख आणि कॉ. नलिनीताई कलबुर्गी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

**दत्तनगरला पोलिसांचा गराडा; आंदोलकांनी बदलली रणनीती**

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकाळी ९ वाजल्यापासून दत्तनगर येथील लाल बावटा कार्यालयाला पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावत घेराव घातला. त्यामुळे नियोजित ठिकाणी आंदोलकांना एकत्र येणे शक्य झाले नाही. मात्र, पोलिसांचा बंदोबस्त झुगारून विविध भागांतील कार्यकर्ते जथ्यांच्या स्वरूपात शांती चौक, पाणी टाकी परिसरात दाखल झाले.

आंदोलकांनी गनिमी काव्याची रणनीती अवलंबत पुंजाल मैदान बोळातून अचानक मोठ्या संख्येने एकत्र येत लाल झेंडे फडकावले आणि जोरदार घोषणाबाजी करत शांती चौक गाठला. 'स्मार्ट मीटर हटवा!', 'चार श्रमसंहिता रद्द करा!', 'विडी कामगारांना किमान वेतन द्या!', 'कामगार कायद्यांची अंमलबजावणी करा!' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

**चारही दिशांनी कार्यकर्त्यांची शांती चौकात धडक**

कॉ. नसीमा शेख आणि सुनंदा बल्ला यांच्या नेतृत्वाखाली दत्तनगर परिसरातून शेकडो कार्यकर्ते, अमित मंचले यांच्या नेतृत्वाखाली मोदी परिसरातून, किशोर मेहता यांच्या नेतृत्वाखाली गांधी नगर परिसरातून, तर सनी शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली लष्कर परिसरातून तसेच बापूजी नगर परिसरातून मोठ्या संख्येने आंदोलक शांती चौकात दाखल झाले.

आंदोलकांनी शांती चौकात ठिय्या देत रस्ता रोखून 'जेल भरो' आंदोलन सुरू केले. अचानक मोठ्या संख्येने आंदोलक रस्त्यावर उतरल्याने पोलिसांची तारांबळ उडाली. आंदोलकांना हटविण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला असता काही कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये झटापट झाली. त्यामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

**४०० आंदोलक ताब्यात; जेल रोड पोलिस ठाण्यात हलविले**

पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, कार्यकर्त्यांनी मागण्यांच्या जोरदार घोषणा देत आंदोलन सुरूच ठेवले. अखेर पोलिसांनी सुमारे ४०० आंदोलकांना ताब्यात घेतले आणि त्यांना जेल रोड पोलिस ठाण्यात हलविले.

सिटूचे राज्य महासचिव कॉ. एम. एच. शेख यांनी स्मार्ट मीटरच्या माध्यमातून सर्वसामान्य वीज ग्राहकांवर आर्थिक भार लादण्याचा प्रयत्न, कामगारांचे हक्क कमकुवत करणाऱ्या चार श्रमसंहिता, विडी कामगारांना किमान वेतनापासून वंचित ठेवण्याची भूमिका, तसेच वाढती महागाई आणि बेरोजगारी याविरोधात सरकारवर तीव्र टीका केली. 'कामगारांच्या हक्कांवर घाला घालाल, तर रस्त्यावर उतरून संघर्ष अधिक तीव्र करू,' असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

स्मार्ट मीटरचा निर्णय मागे घेण्यासह कामगारांच्या सर्व मागण्या मान्य होईपर्यंत संघर्षाची धार अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी सिटूच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

**नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग**

या आंदोलनात ॲड. कॉ. अनिल वासम, कॉ. दत्ता चव्हाण, कॉ. नसीमा शेख, कॉ. शेवंता ताई देशमुख, व्यंकटेश कोंगारी, सुनंदा बल्ला, वीरेंद्र, पद्मा, दाऊद शेख, नरेश दुगाणे, हनीफ सातखेड, किशोर मेहता, मलेशम कारमपुरी, पांडुरंग म्हेत्रे, दीपक निकंबे, अभिजीत निकंबे, विजय हरसुरे यांच्यासह विविध भागांतील कार्यकर्ते सहभागी झाले.

तसेच अमित मंचले, सनी शेट्टी, रविंद गेंट्याल, अरुण सामल, बालाजी गुंडे, शिवा श्रीराम, शहाबुद्दीन शेख, विजय मरेड्डी, किशोर म्हेत्रे, रहीम नदाफ, बजरंग गायकवाड, खाजाभाई करजगी, प्रशांत चौगुले, राजेश काशीद, प्रकाश कलबुर्गी, अमीन शेख, जुबेर सगरी, माजीद नदाफ, युसुफ शेख, अबू शेख, असलम शेख, पिंटू आफक, बागलकोटे यांच्यासह मोठ्या संख्येने कामगार व कार्यकर्ते उपस्थित होते.

**कुंभारीतही सिटूचा जोरदार 'जेल भरो'**

दरम्यान, सिटूचे राज्य उपाध्यक्ष कॉ. युसुफ शेख मेजर आणि कॉ. विल्यम ससाणे यांच्या नेतृत्वाखाली कुंभारी येथेही जोरदार 'जेल भरो' आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात महिला, कामगार आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत स्मार्ट मीटरविरोधात तसेच कामगारांच्या विविध मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी केली.

कुंभारीतील आंदोलनात कॉ. युसुफ शेख मेजर, विल्यम ससाणे, बापू साबळे, विक्रम कलबुर्गी, हसन शेख, रफिक काझी, वसीम मुल्ला, बालाजी तुम्मा, नरसिंग बुगले, आफसाना बेग, राजेंद्र गेंट्याल, आप्पाशा चागले, गोपाळ बंडी, दिनेश बडगु, परशुराम बुगले, संतोष पुकाळे, शबीर नारोकाट, श्रीनिवास गोण्याल, श्रीनिवास डक्का, नागेश सरला, इमाम शेख, कुरमेश म्हेत्रे, अतीक दंडोती, मुन्ना कलबुर्गे, संगीता एडके, मधुकर चिल्लाळ, गुंडप्पा डक्का, नागनाथ जल्ला, योगेश अकीम, चंटी, बिटला, शशिकांत गुंडला, राजू गड्डम, योहान सातालोलु, हनुमंतु पेद्दी, दशरथ आमाटी, चंद्रकांत गोण्याल, कुमार येलगेटी, राजू सीता, श्रीनिवास गोण्याल आणि नरेश गुल्लापल्ली यांच्यासह असंख्य कामगार व कार्यकर्ते सहभागी झाले. कुंभारीतही 'स्मार्ट मीटर हटवा!', 'चार श्रमसंहिता रद्द करा!', 'विडी कामगारांना किमान वेतन व रोख मजुरी द्या!', 'कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करा!'अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

सोलापूर शहरासह कुंभारीत झालेल्या या आंदोलनातून कामगार आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर सिटूने संघर्षाची पुढील दिशा स्पष्ट केली आहे. सरकारने मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास आंदोलन आणखी व्यापक आणि तीव्र करण्याचा निर्धार सिटूच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

# प्रलंबित शासकीय देयकांचा मार्ग मोकळा 'TReDS-MSME' विधेयक संसदेत मंजूर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रातील विविध विभागांमध्ये शासकीय विकासकामे करणारे कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंते, मजूर संस्था तसेच विकासक यांच्या प्रलंबित देयकांच्या प्रश्नावर मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. 'TReDS-MSME' संदर्भातील विधेयक राज्यसभा आणि लोकसभेत अनुक्रमे ३ ऑगस्ट आणि ७ ऑगस्ट रोजी मंजूर झाल्याचा दावा महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ आणि राज्य अभियंता संघटनेने केला आहे. या निर्णयामुळे शासकीय विकासकामांची प्रलंबित देयके तातडीने मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचे संघटनेचे राज्याध्यक्ष इंजि. मिलिंद भोसले यांनी सांगितले. या विधेयकाच्या मंजुरीचे संपूर्ण श्रेय महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ आणि राज्य अभियंता संघटनांना असल्याचे भोसले यांनी स्पष्ट केले. ऑक्टोबर २०२४ पासून या दोन्ही संघटनांच्या माध्यमातून राज्यात 'TReDS-MSME' योजना प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न सुरू होते.

**दिल्ली, मुंबई, पुण्यात सातत्याने बैठका**

यासाठी संबंधित TReDS आणि MSME क्षेत्रातील कंपन्यांच्या दिल्ली व मुंबई येथील अधिकाऱ्यांसोबत तसेच संघटनेच्या शिष्टमंडळासोबत दिल्ली, मुंबई आणि पुणे येथे सातत्याने बैठका घेण्यात आल्या. या बैठकांच्या माध्यमातून प्रलंबित शासकीय देयकांचा प्रश्न सोडविण्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात आला.

हा प्रस्ताव १८ फेब्रुवारी २०२५ रोजी मंत्रालयात सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या समोर झालेल्या मॅरेथॉन बैठकीत मांडण्यात आला. या बैठकीला संबंधित कंपनीचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव तसेच संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्ताव स्वीकारून त्याबाबतचे पत्र महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ आणि राज्य अभियंता संघटनेला दिल्याचे संघटनेने म्हटले आहे.

**प्रस्ताव संसदेत मंजुरीसाठी पाठविला**

यानंतर संघटनेचे पदाधिकारी आणि संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांनी अर्थमंत्री, मुख्यमंत्री तसेच मुख्यमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार समितीच्या माध्यमातून हा सविस्तर प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठपुराव्यासाठी मांडला. पुढे हा प्रस्ताव देशाच्या राजधानीतील संसदेत राज्यसभा आणि लोकसभेच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आला. संघटनेच्या म्हणण्यानुसार, याच प्रस्तावाला विधेयकाच्या माध्यमातून राज्यसभेने ३ ऑगस्ट रोजी, तर लोकसभेने ७ ऑगस्ट रोजी मंजुरी दिली आहे.

**महाराष्ट्रातील तीन लाख कंत्राटदारांना लाभाची अपेक्षा**

या निर्णयामुळे महाराष्ट्रासह देशभरातील शासकीय विकासकामे करणारे कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंते, मजूर संस्था आणि विकासक यांच्या प्रलंबित देयकांच्या प्रश्नावर तोडगा काढण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 'TReDS-MSME'च्या माध्यमातून प्रलंबित देयकांचे तातडीने व्यवस्थापन व निधी उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

या निर्णयाचा महाराष्ट्रातील सुमारे तीन लाख कंत्राटदारांना तसेच देशातील विविध राज्यांमधील लाखो कंत्राटदारांना फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.'ऑक्टोबर २०२४ पासून सुरू असलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आता संसदेत मंजुरीच्या रूपाने यश मिळाले आहे. महाराष्ट्रातील कंत्राटदार, अभियंते आणि मजूर संस्थांच्या प्रलंबित देयकांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरेल,' असे इंजि. मिलिंद भोसले, राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना यांनी सांगितले.

# डॉ. किरण पाटील यांना रसायनशास्त्रात पीएच.डी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथील सामान्य विज्ञान व अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ. किरण संग्राम पाटील यांना जैन विद्यापीठ, बेंगळुरू यांच्याकडून रसायनशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.



डॉ. पाटील यांनी '१,२-बिस आणि १,१,२-ट्रिस-अल्काइल बोरोनेट एस्टर्सचे संश्लेषण व उपयोग' या विषयावर संशोधन केले. डॉ. शुभांकर कुमार बोस यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पर्यावरणपूरक, उत्प्रेरकरहित आणि पाण्याच्या सहाय्याने सेंद्रिय रासायनिक संश्लेषणाच्या अभिनव पद्धती विकसित केल्या.

त्यांच्या संशोधनावर आधारित पाच लेख रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्रीच्या 'ग्रीन केमिस्ट्री'आणि अमेरिकन केमिकल सोसायटीच्या 'द जर्नल ऑफ ऑर्गेनिक केमिस्ट्री' यांसारख्या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत प्रकाशित झाले आहेत. तसेच भारतीय पेटंट कार्यालयाने त्यांच्या तीन पेटंट अर्जांचे प्रकाशन केले आहे. डॉ. पाटील यांनी अभियांत्रिकी व पॅरामेडिकल रसायनशास्त्र विषयावरील तीन पुस्तकेही प्रकाशित केली आहेत. विशेष म्हणजे, त्यांच्या पीएच.डी. प्रबंधाची निवड असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या 'युनिव्हर्सिटी न्यूज' नियतकालिकातील 'थिसिस ऑफ द मंथ' या विशेष विभागासाठी झाली आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक व संशोधन कार्याबद्दल कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ शंकर नवले तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी डॉ. पाटील यांचे अभिनंदन केले.

# अस्खलित इंग्रजीतील प्रभावी भाषणाने ज्योती वाघमारे यांनी गाजवली राज्यसभा

**नवी दिल्ली (वृत्तसेवा):-** राज्यसभेत 'बँकर्स बुक्स एव्हिडन्स बिल'वर चर्चा सुरू असताना खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी अस्खलित आणि प्रभावी इंग्रजीत केलेल्या भाषणाने संपूर्ण सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. आत्मविश्वासपूर्ण मांडणी, अभ्यासपूर्ण मुद्दे आणि प्रभावी वक्तृत्वामुळे त्यांच्या भाषणाची सभागृहात विशेष चर्चा झाली.

आपल्या भाषणाच्या प्रारंभी डॉ. वाघमारे यांनी महाराष्ट्राचे नेते, महिला सक्षमीकरणाचे प्रणेते आणि 'लाडकी बहीण' योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वातंत्र्य देणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे अभिनंदन केले.

'चुलीच्या चौकटीतून बाहेर पडलेली आजची नारी केवळ घरच नाही, तर देशाची अर्थव्यवस्थाही समर्थपणे चालवत आहे,' असा संदेश अर्थमंत्री निर्मला सीतारामन भारतासह संपूर्ण जगाला देत असल्याचे डॉ. वाघमारे यांनी नमूद केले. या विधेयकाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, तब्बल १२५ वर्षे जुन्या वसाहतवादी कायद्यांचा अंत करून भारताला भविष्यासाठी



सज्ज करणारा हा ऐतिहासिक टप्पा आहे. १८९१ पासून २०२६ पर्यंतचा प्रवास या विधेयकातून अधोरेखित होतो. कागदापासून डिजिटल व्यवस्थेकडे, वसाहतकालीन बँकिंगपासून आधुनिक बँकिंगकडे आणि डिजिटल व्यवहारांपासून डिजिटल न्यायव्यवस्थेकडे नेणारा हा महत्त्वपूर्ण पूल असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हे विधेयक केवळ जुन्या कायद्याचे रूपांतर नसून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील 'नव्या भारताचा' आत्मविश्वास आणि आधुनिक अर्थव्यवस्थेच्या दिशेने भारताची वाटचाल दर्शवणारे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचेही डॉ. वाघमारे यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट केले. राज्यसभेतील त्यांच्या प्रभावी इंग्रजी भाषणाची शैली, विषयाची अभ्यासपूर्ण मांडणी आणि आत्मविश्वासपूर्ण वक्तृत्वामुळे सभागृहात त्यांचे विशेष कौतुक झाले.

# स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यस्मरणानिमित्त मोफत आरोग्य शिबिर- प्रणव परिचारक

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** कर्मयोगी श्रद्धेय स्व. सुधाकरपंत परिचारक (मालक) यांच्या पुण्यस्मरणानिमित्त पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया (लेन्ससहित) तसेच सर्व रोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर तब्बल दहा दिवस चालणार असल्याची माहिती पांडुरंग परिवाराचे युवा नेते प्रणव परिचारक यांनी दिली.

पांडुरंग परिवार युवक आघाडी व प्रणव परिवार युवा मंच, पंढरपूर यांच्या वतीने हे नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले असून, शंकरराव साळवे नेत्र रुग्णालय, सोलापूर (एच. व्ही. देसाई आय इन्स्टिट्यूटचा प्रकल्प)यांचे विशेष सहकार्यातून तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील ज्या मदतीने हे शिबिर घेतले जाणार आहेत.

या आरोग्य उपक्रमांतर्गत ११ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत तालुक्यातील विविध गावांमध्ये सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावाजवळच तज्ज्ञांकडून आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. यासाठी सोलापूर आणि पुणे येथील डॉक्टर उपस्थित राहतील. महत्वाचे म्हणजे या शिबिराच्या माध्यमातून गेल्या काही वर्षापासून मोतीबिंदू मुक्त डोळस पंढरपूर तालुका करण्याचा संकल्प प्रणव परिचारक यांच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

नेत्र तपासणी शिबिराची सुरुवात ही ११ ऑगस्ट रोजी तुंगत पासून होईल.

तुंगत नंतर पुढे , १२ ऑगस्ट रोजी गादेगाव , १३ ऑगस्ट रोजी खर्डी, १४ ऑगस्ट रोजी उंबरे-पागे आणि १६ ऑगस्ट रोजी रांजणी येथील आरोग्य केंद्रात शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर १८ ऑगस्ट रोजी कासेगाव , १९ ऑगस्ट रोजी रोपळे, २० ऑगस्ट रोजी पुळुज, २१ ऑगस्ट रोजी करकंब ग्रामीण रुग्णालय आणि २२ ऑगस्ट रोजी भाळवणी येथे आरोग्य तपासणी शिबिर होऊन समारोप होणार आहे.

या शिबिरामध्ये नागरिकांची नेत्र तपासणी करून मोतीबिंदू आढळल्यास पुढील मोफत शस्त्रक्रियेसाठी आवश्यक मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. अद्ययावत अशा सर्वोपचार रुग्णालयात रुग्णांना मोफत घेऊन शस्त्रक्रिया करून दिली जाणार आहे. यासोबतच विविध आजारांचे मार्गदर्शनही तज्ञ डॉक्टरांकडून होईल.

ग्रामीण भागातील नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन प्रणव परिचारक यांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या सामाजिक कार्याच्या स्मृती जपत आरोग्यसेवेच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत असल्याने या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# अकलूजचा ऋतुराज रास्ते घुमवणार अमेरिकेत मराठी लोककलेचा डंका

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूजच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा वारसा जपत अकलूजचा सुपुत्र, सदाशिवराव माने विद्यालयाच्या, माजी विद्यार्थ्याने यशोशिखरावर गवसणी घातली आहे. ऋतुराज सुधीर रास्ते हा कलाकार आता 'द फोक आख्यान' या महाराष्ट्रातच नव्हे संपूर्ण देशात गाजत असलेल्या, विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून मुख्य 4 वादकापैकी एक म्हणून थेट, अमेरिकेत महाराष्ट्राची लोककला आणि संगीत सादर करून अकलूजचे नाव सातासमुद्रापार उज्ज्वल करणार आहे.



ऋतुराजने आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयात पूर्ण केले. पहिलीत असल्यापासूनच त्याला संगीताची आवड होती. शालेय जीवनात विविध स्पर्धांमध्ये तसेच सदाशिवराव माने विद्यालयाच्या संगीत समूहात सक्रीय सहभाग नोंदवत त्याने संगीतातील बारकावे आत्मसात केले. संगीताचे खऱ्या अर्थाने प्राथमिक आणि पायाभूत धडे अर्थात "बाळकडू" त्याला सदाशिवराव माने विद्यालयातच मिळाले.

संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते - पाटील यांचे प्रोत्साहन, तसेच प्राथमिकच्या मुख्याध्यापिका जाधव मॅडम,माध्यमिकचे मुख्याध्यापक प्रताप पाटील, संगीत शिक्षक झांबरे, यांचे योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळे माझा वादन कलेचा पाया मजबूत झाला असे ऋतुराज रास्ते यांनी सांगीतले .

संगीताची कला जोपासत ऋतुराजने शिक्षणातही मोठी मजल मारली. कोल्हापूरच्या श्री छत्रपती शाहू महाराज कृषी महाविद्यालय (शिवाजी विद्यापीठ) येथून B.Sc. (Agri) पूर्ण केल्यानंतर, त्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात M.Sc. साठी

शिक्षण घेत असतानाच त्याने संगीत क्षेत्रातील आपले प्रभुत्व सिद्ध केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना त्याने आंतरराज्य, विभागीय, राज्यस्तरीय आणि केंद्रीय स्तरावरील अनेक प्रतिष्ठित संगीत स्पर्धांमध्ये विजेतेपद पटकावून आपल्या वादन कौशल्याची छाप पाडली.

राहुरी विद्यापीठा मध्ये इंद्रधनुष्य व नॅशनल स्पर्धेसाठी प्रशिक्षक म्हणून काम करत असताना गुजरात, बंगलोर, येथील स्पर्धेत 2रे विजेतेपद मिळवून दिले.

लोककलेतील ताल वाद्यातील सर्व प्रकारचे वाद्य तो सहजपणे उत्कृष्ट प्रकारे लयबद्ध वाजवण्याची कला त्याने आत्मसात केली आहे.

महाराष्ट्रातील अस्सल लोककला, लोकसंगीत आणि पारंपरिक आख्यानशैली यांचा मिलाफ असलेल्या 'द फोक आख्यान' या शोच्या माध्यमातून मुख्य वादक म्हणून ऋतुराज अमेरिकेतील विविध 6 प्रमुख शहरांमध्ये आपली कला सादर करणार आहे. अकलूजच्या मातीत घडलेला हा कलाकार आज आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राच्या लोककलेचे प्रतिनिधित्व करत असल्याने संपूर्ण अकलूज शहरात अभिमानाचे वातावरण असून ऋतुराजवर कौतुकाचा वर्षाव होत असून, अमेरिकेतील या दौऱ्यासाठी त्याला उदंड शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# OPD मध्येच ५५ वर्षीय रुग्णाला तीव्र हृदयविकाराचा झटका; डॉक्टरांच्या तत्परतेने मिळाले जीवदान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील रेल्वेलाईन परिसरातील हृदयम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आलेल्या एका ५५ वर्षीय रुग्णाला ओपीडीमध्येच अचानक तीव्र हृदयविकाराचा झटका आल्याची घटना आज दुपारी घडली. रुग्णाच्या छातीत तीव्र वेदना होत असल्याने (Severe Chest Pain) ते उपचारासाठी आले होते. मात्र तपासणी सुरू होण्यापूर्वीच त्यांची प्रकृती अचानक गंभीर झाली.

रुग्णाला हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याचे लक्षात येताच हॉस्पिटलमधील ओपीडी स्टाफने क्षणाचाही विलंब न करता आपत्कालीन उपचार सुरू केले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून अवघ्या काही सेकंदांत CPR (Cardiopulmonary Resuscitation) सुरू करण्यात आले.

दरम्यान, हृदयम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉक्टर शैलेश पाटील यांनी स्वतः पुढाकार घेत रुग्णाला तातडीने CPR दिले. त्यानंतर आवश्यकतेनुसार DC (Direct Current) शॉक/डिफिब्रिलेशन देत पुढील आपत्कालीन उपचार करण्यात आले.



डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे गंभीर अवस्थेतील रुग्णाला वेळेत उपचार मिळाले आणि त्यांचे प्राण वाचविण्यात यश आले.

**काही सेकंदांची तत्परता ठरली जीवदान देणारी**

हृदयविकाराच्या तीव्र झटक्याच्या वेळी सुरुवातीचा काळ अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. अशा परिस्थितीत रुग्णाला तातडीने CPR देणे आणि आवश्यक असल्यास डिफिब्रिलेशनसह पुढील आपत्कालीन उपचार करणे महत्त्वाचे ठरते. या घटनेतही रुग्णाला वेळ न दवडता उपचार मिळाल्याने त्यांना जीवदान मिळू शकले.या संपूर्ण घटनेचे CCTV फुटेज हॉस्पिटलमध्ये कैद झाले आहे. या फुटेजमध्ये रुग्णाची अचानक बिघडलेली प्रकृती, त्यानंतर हॉस्पिटल स्टाफकडून तातडीने सुरू करण्यात आलेले CPR आणि डॉक्टरांकडून करण्यात आलेले आपत्कालीन उपचार दिसून येत आहेत.

हृदयविकाराचा झटका कोणत्याही क्षणी आणि कोणत्याही ठिकाणी येऊ शकतो. अशावेळी रुग्णाला तातडीने योग्य प्रथमोपचार व वैद्यकीय उपचार मिळणे किती महत्त्वाचे आहे, हे या घटनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. CPRचे प्रशिक्षण आणि आपत्कालीन परिस्थितीत योग्य वेळी केलेली कृती अनेकदा रुग्णाचे प्राण वाचविण्यासाठी निर्णायक ठरू शकते, हे या घटनेतून स्पष्ट झाले.

हृदयम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमधील डॉक्टर शैलेश पाटील तसेच ओपीडी स्टाफने दाखविलेल्या प्रसंगावधान आणि तत्परतेचे कौतुक होत आहे.

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात रक्तदान शिबीर संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज, येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने, ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून,सोमवार दि. 10 ऑगस्ट 2026 रोजी रक्तदान शिबीर संपन्न झाले. या रक्तदान शिबिरात 25 रक्तदात्यांनी सहभागी होत रक्तदान केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून इंडियन मेडिकल असोसिएशनचे डॉ.अजित गांधी हे उपस्थित होते.

आपल्या मनोगतात त्यांनी, रक्तदानाचे महत्त्व विशद केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य



प्रा.डॉ. शिवप्रसाद टिळेकर, डॉ. हनुमंत अवताडे, डॉ. विश्वनाथ आवड, डॉ. बाळासाहेब मुळीक,डॉ. सतीश देवकर, डॉ. जनार्दन परकाळे, डॉ.चंकेश्वर लोंढे,प्रा. दादासाहेब कोकाटे, डॉ. चंद्रशेखर ताटे देशमुख, प्रा.रविराज सोनवणे, ग्रंथपाल डॉ. दत्तात्रय पाटील, डॉ. सविता सातपुते, डॉ.पल्लवी मिसाळ, डॉ. विजय शिंदे, प्रा. जी जी धायगुडे, प्रा. विनायक माने, प्रा. उत्तम वाघमोडे, प्रा. रणजीत लवटे, कार्यालयीन प्रबंधक राजेंद्र बामणे उपस्थित होते. या रक्तदान शिबिरामध्ये स्वयंसेवकाबरोबर प्राध्यापक प्राध्यापिका यांनीही सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.दत्तात्रय मगर यांनी केले तर आभार डॉ. सज्जन पवार यांनी मानले व सूत्रसंचालन प्रा.स्मिता पाटील यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी परिश्रम घेतले.